# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 27/01/2024 (शनिवार) सायंकाळ

---

### घरफोडी

पो.स्टे. एमआयडीसी बोरी :- अंतर्गत १० किमी अंतरावर खापरी मोरेश्वर येथे दिनांक २६/०१/२०२४ चे रात्री ०२.०० वा. ते ०२.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे- कृष्णा कंठीरामजी सावरकर, वय ७२ वर्ष, रा. खापरी मोरेश्वर (सेवानिवृत्त शिक्षक) हे आपले घरी झोपले असता अंदाजे रात्री ०२/०० वा. दरम्यान घराजवळील लोकांनी चोर चोर असा आवाज केला असता फिर्यादीने झोपेतुन उठुन आपले स्वत:चे घरातच पाहीले असता घरातील एका रूम मध्ये ठेवलेल्या लोखंडी ०३ कपाटामधील कपडे अस्ताव्यस्त पडलेले दिसले व नगदी ५ ते ७ हजार रू. व चांदीचे करंडे किंमती १५००/- रू. व बेंटेक्सचे नेकलेस १५००/- रू. असा एकुण १००००/- रू. चा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे अज्ञात आरोपी विरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर घटनास्थळी सपोनि भुजबळ पोस्टे एमआयडीसी बोरी यांनी भेट दिली असुन फॉरेन्सिक वाहनाने भेट दिली आहे. सदर घटनास्थळी गुन्हयाचा पुढील तपास सपोनि भुजबळ पोस्टे एमआयडीसी बोरी मो. नं. ९९२२६०९११९ हे करीत आहे.

### अपघातात मृत्यु

पो.स्टे. सावनेर :- अंतर्गत ०२ किमी अंतरावर सावनेर ते छिंदवाडा रोड मॉर्निंग स्टार शाळेसमोर दिनांक २५/०१/२०२४ चे १८.०० वा. दरम्यान **मृतक नामे- महेश फुनशा उईके, वय २३ वर्ष रा. ह.मु कवठा मालु कंपनी सावनेर** हा त्याचे भावाची मोटरसायकल स्प्लेंडर क्रमांक एम.पी-२८/एन. ई- ९२८६ या मोटरसायकलने सावनेर येथे दिनांक २५/०१/२०२४ चे सायंकाळी ०५/०० वा. दरम्यान किराणा सामान घेण्याकरीता येत असता सावनेर कडुन येणारी स्विफ्ट कार क्रमांक एम.एच-३१/डी.व्ही.- ५१३३ च्या चालकाने आपली कार भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन मोटरसायकलला ठोस मारून फिर्यादीचे भाऊ महेश फुनशा उईके वय २३ वर्ष यास गंभिर जखमी करून आपले कारसह पळुन गेला. जखमीस ग्रामीण रूग्णालय सावनेर येथे प्राथमिक उपचार करून पुढील उपचार करणे करीता मेयो हॉस्पीटल, नागपुर येथे रेफर केल्याने डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे- मनोज संपतलाल उईके, वय २७ वर्ष रा. जैतपुर ता. तामीया जि. छिदवाडा (म.प्र.) ह. मु. कवठा सावनेर यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपी कार चालकाविरुध्द कलम २७९, ३३८, ३०४ (अ) भादंवि. सहकलम १८४ मो.वा.का भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर घटनास्थळी पोलीस हवालदार बंडु कोकाटे यांनी भेट दिली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार बंडु कोकाटे, मो. नं. ९८२२९४३६०५ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर